२००८-२००९

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग



## ८ वा वार्षिक अहवाल

१ एप्रिल २००८ -३१ मार्च २००९

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## ८ वा वार्षिक अहवाल

(एप्रिल २००८ - मार्च २००९)

वाय २१८५-१

अनुक्रमणिका


**प्रस्तावना** पृष्ठे क्रमांक

१. परिचय . . . . . . . . १

२. आयोगाने हाताळलेल्या तक्रारी . . . . . . ३

३. अटक झालेल्याचे अधिकार . . . . . . ५

४. मानवी हक्क शिक्षण व जागृती प्रोत्साहन . . . . . . ७

५. प्रशासकीय आणि साधन सामुग्री पुरवठा . . . . . . ९

६. आयोगाने निकाली केलेली, शिफारशी केलेली प्रकरणे . . . . . . ११

**परिशिष्ट - ४ अ**

(डी. के. बसू केसमधील सर्वोच्च न्यायालयाची ११ मार्गदर्शक तत्त्वे) . . . . १७

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपति शिवाजी टर्मिनस (व्हीटी) समोर, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी : २२०३ ४२३३ ● फॅक्स : २२०९ १८०४

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा हा आठवा वार्षिक अहवाल आहे. १९५० साली स्वीकारलेली जगातील मानवी हक्क अधिष्ठित अशा जगातील राज्य घटनांपैकी भारतीय राज्य घटना आहे. मानवी हक्क (१९४८) घोषणापत्र मसुदा आणि भारतीय राज्य घटना एकाच काळात तयार करण्यात आली. भारतीय राज्य घटनेतील भाग ३ कलम १४- १५ मध्ये समाविष्ट असलेले मुलभूत अधिकार आणि राज्याची मार्गदर्शक तत्वे आणि राज्य घटनेच्या मानवी हक्कांची आवश्यकता तिच्या प्रास्ताविकातून केलेली आहे आणि हे राज्य घटनेतील नागरिकांना दिलेले हक्क ज्यांना मुलभूत हक्क असे मानवी हक्क, हे जागतिक मानवी हक्कांचा जाहिरनामा तसेच आंतरराष्ट्रीय नागरी आणि राजकीय हक्क आणि आंतरराष्ट्रीय सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतीक करारांशी समांतर आहेत.

कलम २(१) (ड) मानवी हक्क संरक्षण हक्क कायदा १९९३ च्या व्याख्येनुसार मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य, समता आणि प्रतिष्ठेशी संबंधातील अधिकार, मानवाधिकाराद्वारे आणि राज्य घटनेद्वारे निश्चित करण्यात आलेले आहेत आणि ज्यांची भारतातील न्यायालयाच्याद्वारे अंमलबजावणी करता येते.

नागरी समाजामध्ये लोकांचे हक्क हे सार्वभौम सत्तेद्वारा संरक्षित असतात आणि हे हक्क सर्व लोकांसाठी कुठलाही भेदभाव आणि पूर्वग्रह न ठेवता समान अविभाज्य आणि परस्परांवर अवलंबून असतात आणि प्रत्येक मानवाला प्रतिष्ठेचे जीवन जगण्यासाठी या अधिकाराची जाणीव असणे आवश्यक आहे.

न्यायव्यवस्था आणि मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कार्यकारी यंत्रणेला पाठींबा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने गृहविभाग निर्णय (एच आर सी - १०९९-२७८) पोल १४, दिनांक १५ जानेवारी २००० नुसार राज्य मानवी हक्क आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना दिनांक ६ मार्च २००१ रोजी मानवी हक्क कायदा संरक्षण कलम २१ (१) नुसार झाली. तेव्हापासून मानवी हक्क आयोग हा नागरिकांचे मानवी हक्क भंग होण्यापासून संरक्षण करीत आहे. मानवी हक्क संरक्षण कलम १२ नुसार प्रभावीपणे काम करण्यास मानवी हक्क आयोगाने कोणतीही कसर बाकी ठेवली नाही.

जेव्हा लोकांना मानवी हक्क माहिती नव्हते त्यावेळी भेदभाव, असंहिष्णूता, अन्याय, अत्याचार, गुलामगिरी यांच्यासारख्या गैरप्रकाराचा उदय झाला. मानवी हक्क या संकल्पनेचा उदय हा दुसऱ्या महायुद्धाच्या काळात झालेले अत्याचार आणि प्रचंड नरसंहार या घटनांमुळे झाला. संयुक्त राष्ट्रसंघाने प्रत्येक माणसाला स्वतःचे हक्क जाणण्यासाठी जागतिक मानवी हक्कांचा जाहिरनामा तयार केला. त्याआधारावर जग हे स्वातंत्र्य, न्याय आणि शांतीच्या तत्त्वावर निर्मित करावयाचे आहे. मानवी हक्कांचा संदर्भ हा मूल्यांची विविधता आणि सक्षमता आणि मानवी इतिहास व मानवी परिस्थितीशी विविधताशी निगडीत आहे.

मानवी हक्काचे करार आणि दर्जा यांची राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर यशस्वीपणे अमंलबजावणी होणेसाठी हे अन्यायग्रस्तांपर्यंत त्यांच्या पोहचण्यावर अवलंबून आहे. त्यासाठी उपाययंत्रणा करण्याची मानके व प्रवेश दोन्ही परिचीत असणे आवश्यक आहे.

आयोगाचे ध्येय हे मुलभूत मानवी हक्कांचे संरक्षण, जतन आणि लक्ष्य साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे हे आहे. मानवी हक्क आयोगाला तपासासाठी पूरेसे अधिकार देण्यात आलेले आहेत आणि सरकारला मानवी हक्कांचे उल्लंघन, मानवी हक्कांबाबतचे वैयक्तिक आणि सार्वजनिक महत्व याबाबत अहवाल सादर करण्याचे अधिकार आहेत. जनतेचे हित ही मुख्य बाब मानून मानवी हक्क उल्लंघन निवारण करण्यासाठी स्वयंखुद्द प्रकरणे दाखल करून घेण्यात पुढाकार घेण्यात आलेला आहे.

आज रोजी आयोगात कार्यरत असलेले मा. अध्यक्ष आणि सदस्य यांनी सप्टेंबर २०१३ मध्ये कार्यभार स्वीकारला, आतापर्यंत २००७-०८ ते २०१२-१३ पर्यंतचे वार्षिक अहवाल तयार करुन तत्कालीन सचिव श्री. मफिउल हूसेन यांनी सरकारकडे सादर केले नव्हते, त्याची कारणे त्यांनाच माहिती असू शकतील. त्यानंतर नविन अध्यक्ष आल्यानंतर पूर्वीच्या वर्षाचे प्रलंबित असलेल्या वार्षिक अहवालाचे कार्य प्राधान्यक्रमाने घेवून ते आता सादर करण्यात येत आहे.

श्री. भगवंतराव डी. मोरे
सदस्य.

न्यायमुर्ती, श्री. एस. आर. बन्नूरमठ,
अध्यक्ष.

स्थळ : मुंबई,
दिनांक :

वाय २१८५-२

## भाग – १

**परिचय :**

१.१ महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग हे मानवी हक्कांचे संरक्षण करण्याचे कार्य करते. मानवी हक्क आयोगाच्या मुख्य कार्यानुसार सार्वजनिक किंवा शासकीय अधिकाऱ्यांमार्फत जनतेला मिळणाऱ्या असमान आणि अन्यायकारक वागणुकीची आणि मानवी हक्कांचे उल्लंघन किंवा त्याबाबत निष्काळजीपणा यांची पुढे येऊन चौकशी करणे हे आहे. मानवी हक्क आयोगाचा ८ वा वार्षिक अहवाल हा १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९ या कालावधीचा आहे.

१.२ महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना दिनांक ६ मार्च २००१ रोजी झाली ज्यावेळी मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ च्या कलम २२ अन्वये महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल यांनी आयोगासाठी एक अध्यक्ष व तीन सदस्य यांची नियुक्ती करण्याचे आदेश जारी केले.

आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संस्थांमध्ये त्यांच्या उपलब्ध साधनांच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्रसंघ जगात एकसमान रितीने मानवी हक्कांचे प्रोत्साहन, संरक्षण आणि त्याची अंमलबजावणी करण्याची इच्छा बाळगणारा जागतिक मानवी हक्कांचा जाहिरनामा हा मानवी हक्क आयोगाच्या स्थापनेतील पायाचा दगड आहे. स्वतःच्या देशांतर्गत मानवी हक्काचे संरक्षण, उपाययोजनेची यंत्रणा बनविणे, ही सदस्य देशाची राजकीय जबाबदारी आहे.

१.३ महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगावर पूर्ण न्यायपीठ जसे एक अध्यक्ष आणि तीन सदस्य कार्यरत होते. २००६ च्या कायदा दुरुस्तीनंतर संख्या कमी करून तीन ऐवजी दोन सदस्य आहेत. आयोगाचे रचनेत पुढीलप्रमाणे समावेश होतो अध्यक्ष हे उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असले पाहिजेत तसेच एक सदस्य हे उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा त्या राज्याचे जिल्हा न्यायाधीश असले पाहिजेत आणि एक सदस्याची नेमणूक ही मानवी हक्कांचे ज्ञान किंवा मानवी हक्कांशी निगडीत असलेला व्यवहारीक अनुभव असलेल्या व्यक्तिंमधून करण्यात येते. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग हा परिपत्रक नं. एच.आर.सी १०९९/३७८/पी – १०-१४ दि. १५ जानेवारी २००० गृहविभाग, नुसार अस्तित्वात आला. आयोग ६ मार्च २००१ पासून कार्यान्वित झाला. मानवी हक्क संरक्षणाचे उद्देशाने आयोगास न्यायालये प्रक्रियेत सामील होणे तसेच तुरूंग आणि कोठडीगृहास भेट देण्याचे अधिकार आहेत. आयोगाने मानवी साक्षरता वाढीला प्रोत्साहन तसेच त्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या अशासकीय संस्था आणि संघटना यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला आहे.

१.४ आयोग सुमोटो चौकशी करू शकतो किंवा मानवाधिकार उल्लंघनाचे बळीद्वारे दाखल केलेल्या तक्रार, याचीकेची किंवा त्याच्यावतीने कोणत्याही व्यक्तिने प्रतिनिधी म्हणून दाखल केलेल्या याचिकेची चौकशी करू शकतो. कोणताही लोकसेवक मानवी हक्क उल्लंघनास प्रोत्साहन देत असेल अथवा गून्ह्यास मदत करत असेल किंवा अशा उल्लंघनास प्रतिबंध करण्यास निष्काळजीपणा करत असेल अश्या तक्रारीची आयोग सुमोटो चौकशी करू शकतो. मानवी हक्कांचे उल्लंघनाबाबत न्यायालयापुढे प्रलंबित असलेल्या तक्रारीचे कार्यवाहीत अशा न्यायालयाच्या मान्यतेने मध्यस्थी करू शकतो.

१.५ **रचना :**

या अहवालाच्या काळात आयोगाचे अध्यक्ष मा. न्यायमुर्ती क्षितीज व्यास हे होते आणि सदस्य म्हणून न्यायमुर्ती श्री. व्ही. जी . मुनशी, श्री. टी. सिंगारवेल आणि श्री. सुभाष लाला हे आयोगाचे सदस्य होते. आयोगाचे सचिव श्री. मफिउल हूसेन हे होते.

## भाग- २

## आयोगाने हाताळलेल्या तक्रारी

२.१ आयोगाचे कार्याचे हे ८ वे वर्ष आहे. मानवी हक्क विषयक जागृतीचा या काळात अधिक प्रसार झाला, ज्यायोगे आयोगाकडे आलेल्या अन्यायग्रस्त व्यक्तिंच्या तक्रारीच्या संख्येत वाढ झाली. तक्रारीच्या संख्येत हळूहळू वाढ झाली आहे हे लोकांमधील वाढत चाललेल्या जागरुकतेचे प्रतिबिंब असून प्रत्येक वर्षी येणाऱ्या तक्रारीत होणाऱ्या वाढीत ते दिसून येते.

**सांख्यिकी माहिती :**

२.२ चालू अहवाल वर्ष २००८-०९ आयोगाकडे एकूण ७२०८ नविन प्रकरणे प्राप्त झालीत. मागील वर्षी २००७-०८ पासूनच्या ५४४७ तक्रारी प्रलंबित आहेत एकूण यंदाच्या तक्रारी १२६५५ आहेत. १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९ या काळात ८५६३ तक्रारी निकालात काढल्या, ४०९२ तक्रारी चालू वर्षाच्या शेवटी प्रलंबित होत्या.

२.३ १२६५५ प्रकरणांपैकी ५१६१ प्रकरणे प्रथम दर्शनी स्वरूपात निकाली काढल्या, ३४०२ प्रकरणे अहवाल आणि सुनावणी प्राप्त झाल्यानंतर निकाली काढण्यात आल्या. अनेक प्रकरणात या अहवाल वर्षात शासनाकडे शिफारशी करण्यात आल्या.

२.४ २००८-०९ या वर्षात १२६ नवीन तक्रारी आयोगाच्या अन्वेषण विभागाकडे पाठविण्यात आल्या होत्या, त्यापैकी १४४ प्रकरणे, १३३ प्रकरणे या वर्षी तपासात होती, ९ प्रकरणे वर्षाच्या शेवटी प्रलंबित होते.

२.५ आयोगाने या वर्षी ४ प्रकरणांची माहिती सुमोटो दखल घेतली.

**तक्रारींचे स्वरूप :**


२.६ आयोगाने प्राप्त ७२०८ तक्रारदारांवर एक विश्लेषणात्मक अभ्यास करून त्याचे खालीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे.

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या प्रतिसाद प्रक्रिया व नियमानुसार**

| | | |
|---|---|---|
| १ | पोलिसदलाविरुद्ध : या तक्रारी शक्यतो गुन्हा, खोटे आरोप, बेकायदेशीर अटक, भ्रष्टाचार, पोलीस दलातील अधिकाराचा गैरवापर, गुन्ह्याची नोंद करण्यात अपयश, खोटे तक्रारीत गोवणे, भ्रष्टाचार इ. तक्रारी समाविष्ट असतात. | १६०० प्रकरणे |
| २ | स्थानिक स्वराज्य संस्थेविरुद्ध तक्रारी, ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगरपालिका, इ. वर्गांचा या तक्रारीत समावेश असतो. | १५६ प्रकरणे |
| ३ | इतर सरकारी विभागांविरुद्ध तक्रारी : असे इतर विभाग, म्हणजे गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, समाज कल्याण विभाग या वर्गांचा यात समावेश करण्यात आला आहे. | ६०३ प्रकरणे |
| ४ | अनुसूचित जाती / जमाती इ. किंवा इतर अल्पसंख्याक यांच्या वरील अत्याचारासंबंधी तक्रारी | ८६ प्रकरणे |
| ५ | कैद्यांच्या मानवाधिकारांचे उल्लंघन संबंधी तक्रारी | ८० प्रकरणे |
| ६ | महिलांवरील अत्याचार व अन्याय उल्लंघन बाबत तक्रारी : या वर्गात छळ, बलात्कार, त्रास आणि महिलांविरुद्ध इतर गुन्हे या तक्रारींचा समावेश असतो. अधिकाऱ्याकडे तक्रार केली असेल परंतु तक्रार दाखल केली नसेल तर त्याची दखल आयोगामार्फत घेतली जाते. | ०७ प्रकरणे |
| ७ | कैद्याचा पोलीस कोठडीत झालेले मृत्यू आणि पोलिसांच्या चकमकीत ठार झालेल्या बदलची माहिती | १४३ प्रकरणे |

**प्रक्रियेच्या नियमानुसार आयोगाने प्रतिसाद न देण्यायोगे**

| | | |
|---|---|---|
| १ | सेवाबाबींविरुद्ध तक्रारी | ५८० प्रकरणे |
| २ | कुटुंबातील वादांविषयक तक्रारी | २६७ प्रकरणे |
| ३ | जमिनीसंबंधी तक्रारी | ४६९ प्रकरणे |
| ४ | खाजगी व्यक्तींविरुद्ध तक्रारी | २६८८ प्रकरणे |
| ५ | बँका, पूर्वप्राप्ती एजंट, कर्ज इ. विरुद्ध तक्रारी | १०७ प्रकरणे |
| ६ | इतर तक्रारी | ४२२ प्रकरणे |




२.७ वर्षामध्ये वरील आलेखानुसार असे लक्षात आले आहे की, पोलीस अधिकाऱ्यांच्याविरुद्ध तक्रारी संख्येने मोठया आहेत. त्यामुळे प्रशिक्षण आणि संवेदनशीलकरण कार्यक्रमाची पोलिसांना आवश्यकता आहे.

**सुमोटू (स्वतःहून) दखल घेतलेली प्रकरणे :**

२.८ कलम १२ (अ), मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ च्या तरतुदीनुसार आयोगाला सुमोटू दखल घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत आणि मानवी हक्क अधिकारांचे उघडपणे होणारे उल्लंघन व माहिती प्राप्त होताच स्वतःहून पुढाकार घेऊन स्वतःहून तक्रारीची आयोग दखल घेतो. चालू वर्षी अहवालात आयोगाने ४ प्रकरणांमध्ये सुमोटू दखल घेतली. या प्रकरणातील सारांश थोडक्यात दिला आहे.

**प्रकरण क्रमांक १/२००८**

**न्यायपीठ / मान. अध्यक्ष,** न्यायमूर्ती श्री. क्षितिज आर व्यास

गांधीगिरी करून पाकिस्तानी कलापथक पुन्हा पाकिस्तानात परत पाठविले जाते. – साकीनाका पोलीस स्टेशन

**प्रकरण क्रमांक - २/२००८**

**न्यायपीठ / उपस्थिती** - मान. सदस्य श्री. सुभाष लाला.

निरीक्षणघर, डोंगरी , मुंबई येथील वाईट परिस्थितीबाबत

**प्रकरण क्रमांक - ३/२००८**

**न्यायपीठ / उपस्थिती** - मान. अध्यक्ष, न्यायमूर्ती श्री. क्षितिज आर व्यास

साकीनाका पोलीस स्टेशनमध्ये माहिलेवर बलात्कार बाबत.

**प्रकरण क्रमांक - ४/२००८**

**न्यायपीठ / उपस्थिती** - मान. अध्यक्ष, न्यायमूर्ती श्री. क्षितिज आर व्यास

महाराष्ट्रातील प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरावस्था

**कोठडीतील मृत्यू प्रकरणे –**

२.९ आयोगाला एकूण ५१८ (यात राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाकडून हस्तांतरित प्रकरणांचा सुद्धा समावेश आहे) कस्टोडियल मृत्यू संबंधित सूचना चालू अहवाल वर्षात मिळाल्या २३२ मृत्यूची सूचना भिक्षेकरी गृहातील होती. १२१ मृत्यूची सूचना बाल सुधारगृहातील होत्या. १२ मृत्यू हे पोलीस कोठडीत झाले. १२६ मृत्यूच्या सूचना जेल कोठडीतील होत्या. २२ मृत्यूच्या सूचना मतिमंद मुलांचे गृह यातील होत्या आणि ५ मृत्यू हे पोलीस चकमकीतील होते.

## भाग -३

## अटक झालेल्यांचे अधिकाराबाबत — उपसमिती

३.१ भारतीय संविधानाच्या कलम – ३२ अंतर्गत कार्यक्षेत्रात मा. सर्वोच्च न्यायालयाने विशाखा विरुद्ध राजस्थान सरकार या प्रकरणात असे म्हटले की, ' या जगात प्रत्येक मानवाला मूलभूत अधिकार असून ते विविध खंड, देश, जाती, रंग आणि धर्माचे लोक असतील, देश रंग आणि धर्म भिन्न गटांमध्ये त्यांनी वाटून घेतले असले तरी मनुष्य म्हणून ते सर्व एक असून त्यांचे अधिकार समान आहेत. '

मा. सर्वोच्च न्यायालयाने कलम ३२ अन्वये अधिकाराचा वापर करताना या अगोदर, जे काही निर्देश दिलेले आहेत त्या सर्व निर्देशांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या कलम ३२ अन्वये राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाबद्दल खालील प्रकारे विश्वास व्यक्त केला आहे.

आयोग खरोखर एक कुशल मंडळ आहे, की ज्याचा संदर्भ न्यायालयाने या प्रकरणांत दिला आहे. कलम ३२ अंतर्गत या न्यायालयाचे अधिकार आणि कार्यकक्षा कोणत्याही वैधानिक मर्यादाद्वारे, अगदी मानवाधिकार संरक्षण कायदा, १९९३ मधील कलम ३६ (२), मधील तरतुदी अन्वये देखील कमी करता येत नाहीत; देशातील सर्व अधिकार क्षेत्रे कोर्टाच्या निर्देशास बांधील असून त्यांना कोर्टाच्या मदतीनेच त्यांचे कार्य करावयाचे आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग देखील यास अपवाद नाही. आयोगास कोर्टाने दिलेल्या निर्देशानुसारच कार्य करावयाचे आहे, अधिनियमान्वये नव्हे, ज्या अंतर्गत ते गठीत झाले आहे.

३.२ पुढे असेही निरिक्षण करण्यात आले की, " राष्ट्रीय मानवाधिकार आयोग हे मंडळ संसदेने निर्माण केलेल्या कायद्याखाली तयार केले गेले होते, आणि या मागील उद्देश असा होता की, मानवाधिकारांच्या उल्लंघनाबाबत तसेच त्याबाबत समस्या आणि तक्रारींचे परिक्षण आणि तपास करणे तसेच कोणी सार्वजनिक सेवक (कर्मचारी) कामात हलगर्जीपणा करीत असेल तर सदर हलगर्जीपणा रोखण्यासाठी सदर राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची निर्मिती करण्यात आली."

सर्वोच्च न्यायालयाने राज्य मानवाधिकार आयोगांस आदेश दिले की, त्यांनी अनुक्रमे देशांतर्गत आयोगांमध्ये उपसमिती निर्माण कराव्यात. ज्याद्वारे या तत्वांची अंमलबजावणी होते आहे की नाही याचे पर्यवेक्षण करावे तसेच याबाबतच्या आवश्यक ती सर्व पुढील पावले उचलावित जेणे करून या बाबतची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत असल्याची खात्री होऊ शकेल. असेही निरिक्षण करण्यात आले आहे की, सदर समितीस अनपेक्षित तपासणी करण्याची पूर्ण मुभा असेल जेणेकरून सदर तत्वांची योग्य प्रकरे अंमलबजावणी होत असल्याची खातरजमा करता येऊ शकेल.

त्यानुसार, महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने उप – समिती नेमली आहे.

**संबंधित प्राधिकरणाकडून प्रतिसाद :-**

३.३ आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील जिल्हा पोलीस अधीक्षकाकडून यांनी माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ११ मार्गदर्शक तत्त्वांचे योग्य रीतीने पालन केले जात असल्याबाद्दलचा त्रैमासिक अहवाल प्राप्त होतात.

**अनपेक्षित तपासणी भेट :-**

३.४ सुप्रीम कोर्टाने दिलेल्या ११ मार्गदर्शक तत्त्वांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होणेकामी आयोगाने मान. अध्यक्ष व इतर सदस्यांनी खालील कोठडी, संस्थांना सन २००८-०९ साली भेटी दिल्या.

| अ. क्र. | पोलीस स्टेशन/तुरुंग कस्टोडियल संस्था | जिल्हा | भेट दिनांक | मान. सदस्य |
|---|---|---|---|---|
| १ | मध्यवर्ती कारागृह | नाशिक | १६/७/२००९ | मान. न्यायमूर्ती के. आर. व्यास |
| २ | जिल्हा मुक्त कारागृह | पैठण | १८/७/२००९ | मान. न्यायमूर्ती के. आर. व्यास |
| ३ | जिल्हा कारागृह, अहमदनगर | अहमदनगर | १०/८/२००९ | मान. न्यायमूर्ती के. आर. व्यास |
| ४ | भद्रकाली पोलीस स्टेशन | नाशिक | ७/५/२००८ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |
| ५ | पिंपळगाव पोलीस स्टेशन | नाशिक | ७/५/२००८ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |
| ६ | नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह | नाशिक | ८/५/२००८ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |
| ७ | महाड सिटी पोलीस स्टेशन | रायगड | १६/७/२००९ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |
| ८ | चिपळूण पोलीस स्टेशन | रत्नागिरी | ७/६/२००८ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |

| अ. क्र. | पोलीस स्टेशन/तुरुंग कस्टोडियल संस्था | जिल्हा | भेट दिनांक | मान. सदस्य |
|---|---|---|---|---|
| ९ | सातारा तालुका पोलीस स्टेशन | सातारा | ८/६/२००८ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |
| १० | शेगांव पोलीस स्टेशन | बुलढाणा | ११/७/२००८ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |
| ११ | कोथरुड पोलीस स्टेशन | पुणे | २७/१०/२००८ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |
| १२ | जयगड पोलीस स्टेशन | रत्नागिरी | ७/१२/२००८ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |
| १३ | रत्नागिरी सिटी पोलीस स्टेशन | रत्नागिरी | ८/१२/२००८ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |
| १४ | जिल्हा कारागृह, रत्नागिरी | रत्नागिरी | ८/१२/२००८ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |
| १५ | सावंतवाडी (सिटी) पोलीस स्टेशन | सिंधुदुर्ग | ९/१२/२००८ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |
| १६ | सावंतवाडी जिल्हा कारागृह | सिंधुदुर्ग | ९/१२/२००८ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |
| १७ | मध्यवर्ती कारागृह | मुंबई | ३१/१/२००९ | मान. न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी |

**निरीक्षण व शिफारसी :-**

३.५ उप समितीने निरिक्षण असे होते की, सर्वोच्च न्यायालयाने निर्देशित केलेल्या ११ मार्गदर्शक तत्वे योग्य पद्धतीने जवळजवळ सर्व पोलीस स्टेशनमध्ये लावण्यात आले आहेत. काही प्रकरणी असे सूचविण्यात आले आहे की, असे निर्देश फलक ठळक दिसून येतील अशा जागी लावण्यात यावेत. काही प्रकरणी अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, अटक व्यक्तिचा तपशील योग्य पद्धतीने नोंदवहीत लिहिण्यात यावा. तसेच कागदोपत्री पूरावा - अटके संदर्भातील माहिती अटक केलेल्या व्यक्तिच्या नातेवाईकांना देण्यात यावी; तसेच सदर व्यक्तिचा वैद्यकीय तपासणी अहवाल देखील योग्य पद्धतीने जतन करावेत; पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट बजावण्यात आले होते की, त्यांना अटक केलेल्या व्यक्तिला त्याच्या हक्कांबाबत जाणीव / माहिती करून दिली पाहिजे. तपासणी दरम्यान अटक व्यक्तिस त्याच्या वकीलास भेटण्याची मुभा दिली पाहिजे. कर्तव्यावर असलेल्या पोलीस अधिकाऱ्यास हे सूचित करण्यात आले होते की, अटक संक्षेप तयार करतेवेळी अधिक काळजीपूर्वक केला जावा, अटक केलेल्या व्यक्तिच्या शरीरावर जखमा आढळून आल्या अथवा इतर बाबतीत अशी परिस्थिती असेल तर ताबडतोब सदर व्यक्तिची / वैद्यकीय तपासणी करण्यात यावी. तसेच उप समितीच्या सभासदांनी महाराष्ट्रात असलेल्या बहुतेक तुरूंगाना भेटी दिल्या. तुरुंगात अडकलेल्या व्यक्तिबाबत मुख्य तक्रार अशी होती की, त्यांना न्यायालयासमोर नियमितपणे हजर करण्यात आले नाही, त्यामुळे त्यांचे खटले चालवण्यास विलंब झाला आणि त्यामुळे कारण नसताना अधिक काळासाठी तुरुंगात रहावे लागते. त्यानुसार, तुरुंग अधिकाऱ्यांना / अधीक्षकांना अधिक काळजीपूर्वक काम करण्याचा व अटक व्यक्तिंना नियमितपणे न्यायालयासमोर हजर केले जाईल याबद्दल खबरदारी घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच , वैद्यकीय उपचारासंदर्भातील तक्रार जी सेवा सदर अटक व्यक्तिंना देणे योग्य पद्धतीने देण्याची आवश्यकता आहे त्या तुरुंग अधीक्षकांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**३.६ उप समितीची कामेः–**

मानवाधिकार संरक्षण कायदा , १९९३ मधील कलम १२ (जे) आयोगास असे अधिकार प्रदान करते की, " ज्याद्वारे मानवाधिकारांचे संरक्षण करण्याबाबतचे अत्यावश्यक अशी इतर कार्ये करण्याचे अधिकार आयोगास प्राप्त होतात. " समाजातील विविध स्तरांवर अटक व्यक्तिच्या हक्कांबाबत साक्षरता प्रसारीत करण्यासाठी, तसेच त्यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या सुरक्षिततेचे उपायांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आयोगाने काही पावले उचलली आहेत, त्यासाठी आयोगाने प्रसिद्धीमाध्यमे, परिसंवाद तसेच कार्यशाळा आयोजित केल्या आहेत.

**आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन साजरा करणे तसेच दिनदर्शिका प्रसिद्ध करणे :-**

माननीय अध्यक्ष, मानवाधिकार आयोग, श्री. के. आर. व्यास (माजी मुख्य न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई) यांनी लोकांमध्ये याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी दिनदर्शिका प्रसिद्ध करण्याची कल्पना मांडली आणि सर्व सदस्यांनी एकमताने ती मान्य केली आणि अंमलात देखील आणली. आयोगाने सन २००९ साली कॅलेंडर प्रसिद्ध केले. सदर कॅलेंडर पोलीस महासंचालक श्री. ए. एन. रॉय यांनी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या इमारतीमध्ये मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमादरम्यान आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनादिवशी प्रकाशित केले आणि सदर कॅलेंडरच्या प्रती राज्यामधील सर्व तुरुंग, सर्व पोलीस स्टेशन्स व इतर स्थानबद्धततची ठिकाणे इ. ठिकाणी रवाना केल्या, सर्वोच्च न्यायालयाने निर्देशित केलेले ११ मार्गदर्शक तत्वे ए आय आर १९९७ एस. सी. ६१० (डी.के. बसू वि. बंगाल राज्य सरकार) या न्यायालयीन निर्णयाद्वारे अधिक ठळकपणे / परिणामकारित्या शब्दबद्ध करण्यात आले. आयोगास असे वाटते की, असे उपक्रम लोकांमध्ये सदर विषयांबाबत जागरूकता निर्माण करण्यात सहाय्यभूत ठरतील.

## भाग - ४

## मानवी हक्क शिक्षण आणि जागरुकता प्रचार

४.१ महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग ही अशी संस्था आहे की, जी प्रामुख्याने राज्य यंत्रणेकडून घडणाऱ्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या कृतीच्या संदर्भातील काम करते. सदर आयोगास केवळ अर्ध न्यायिक अधिकार आहेत, ज्याद्वारे आयोग केवळ शिफारसीच्या स्वरूपात सूचित करू शकते, परंतु अनिवार्य आदेश करू शकत नाही. हे लक्षात यावे की विविध कायद्यामधील तरतुदीमुळे अनेक तक्रारींना प्रतिसाद देणे शक्य होत नाही.

४.२ जे लोक अशा मानवी हक्कांच्या उल्लंघनास बळी ठरलेत ज्यांचे मानवाधिकार नाकारण्यात आले आहेत, अशा पीडित व्यक्तिंच्या मनात नेहमीच अशी जुलमी लोकांना धडा शिकविण्याची सुप्त इच्छा दडलेली असते. जेव्हा समाजरचना जेव्हा अशा पीडित लोकांच्या इच्छा पूर्ण करण्यात अपयशी ठरते, तेव्हा हे लोक समाजरचनेची चौकट सोडून अन्य मार्गाकडे वळू शकतात. जो मार्ग अशा लोकांना बेकायदेशीर समाजविघातक वर्तणुकीकडे म्हणजेच अंतिमतः विनाशाकडे घेऊन जाऊ शकतो.

४.३ म्हणूनच, थेट सदर विषयाच्या मुळाशी जाऊन, म्हणजेच जिथून पीडित / तक्रारदार व्यक्ती आयोगाशी संपर्क करतात तेथे जाऊन काम करण्याची गरज आहे. मानवाधिकाराबाबत शिक्षण आणि मानवाधिकारांच्या उल्लंघनाबाबतच्या तक्रारीचे अन्याय निवारणाबाबत उपलब्ध विविध मंचाबाद्दल पीडिताना माहिती देऊन जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे.

४.४ सदर ध्येय समोर ठेवून आयोग विविध कार्यक्रम, कार्यशाळांचे परिसंवादांचे / चर्चासत्रांचे आयोजन करीत आहेत.

## भाग - ५

## प्रशासकीय प्रकरणे आणि साधनसामुग्री पुरवठा

५.१ महाराष्ट्र शासनाने रीतसर शासन निर्णय क्र. एच.आर.सी. -१०९९/३७८/पोल.-१४, दि. १५ जानेवारी रोजीच्या निर्णयाद्वारे महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग स्थापन करण्यात आला. सदर आयोग ६ मार्च २००१ रोजी कार्यान्वित झाले आणि प्रत्यक्ष कामाला दिनांक १२ मार्च २००१ पासून सुरूवात झाली. या शासकीय निर्णयानुसार आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे असेल. न्यायमूर्ती क्षितिज व्यास यांना ६ ऑक्टोबर २००७ रोजी आयोगाचे अध्यक्षपद देण्यात आले, आणि त्यांनी सातत्याने काम केले. न्यायमूर्ती श्री. व्ही.जी. मुनशी, श्री. टी. सिंगारवेल आणि श्री. सुभाष लाला यांनी या वर्षाकरिता सदर आयोगाचे सभासद म्हणून काम पाहिलेत.

### कर्मचारी

५.२ आयोगाचे कर्मचारी विविध विभागात जसे प्रशासकीय विभाग, लेखा विभाग, तपास विभाग, विधी विभाग आणि संशोधन विभागात काम करतात. श्री. माफिउल हुसेन हे आयोगाच्या सचिव पदावर दिनांक २६ मे २००८ पासून आजपर्यंत रूजू होते. श्री. डी. कनकरत्नम हे विशेष पोलीस महानिरिक्षक म्हणून दिनांक ४ जून २००८ पासून काम पहात होते. श्रीमती नीना खापर्डे ह्यांनी ह्या वर्षात प्रबंधक म्हणून काम पाहिले. ह्या वर्षी श्री. व्ही. जी. परूळेकर ह्यांनी कक्ष अधिकारी व श्री. जी. रविशंकर यांनी अधीक्षक म्हणून दिनांक १९ जानेवारी २००७ ते आजतागायत काम पाहिले, डॉ. जयश्री पाटील यांनी संशोधन अधिकारी म्हणून या पदावर नियमित काम केले, श्री. आर. डी. शिरसाठ यांनी दिनांक २२ ऑक्टोबर २००७ पासून आजतगायत सहायक प्रबंधक म्हणून काम केले.

### परिसर / आवार

५.३ महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्र. एच.आर.सी. -१०९९/३७८/पोल.-१४, दि. १५ जानेवारी २००० नुसार राज्य मानवी हक्क आयोगाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे असावे असे नमूद केले होते. त्यानुसार सरकारने देऊ केलेल्या किंवा वाटप करण्यात आलेले भूखंड जसे नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय समोर, सरकारी वाहतूक सेवा वरळी, अरूण चेंबर्स, ताडदेव, मुंबई, नवीन प्रशासकीय इमारत बांद्रा (पूर्व) आणि जुने कस्टम भवन, मुंबई. शेवटी त्यांच्या परिपत्रक क्रमांक जी. ए./११.०१/सी.एन. १५/२००१/२२ दिनांक २० जून २००२ नुसार सरकारने १३८० चौ.फूट जागा जी प्रशासकीय स्टाफ कॉलेज इमारत नं. -९, हजरीमल सोमानी मार्ग, सी.एस.टी. समोर, मुंबई ४०० ००१ आयोगाला दिली. सदर जागा यापूर्वी राज्य वित्त आयोगाने व्यापलेली होती महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग याच आवारात कार्यरत आहे.

### संसाधने :-

५.४ २००८-०९ च्या वर्षात राज्य शासनाकडे उपलब्ध अनुदान रुपये १ करोड ९७ लाख ६५ हजार होते त्यापैकी एकूण रुपये १ करोड ८८ लाख ५६ हजार खर्च झाला होता.

## भाग – ६

## उदाहरणार्थी प्रकरणे

१. **प्रकरण क्रमांक – १३१/२३/२००६-०७**

**तक्रारदाराचे नाव.—** श्री. प्रकाश गणपत गाडगे.

**प्रतिवादीचे नाव.—** पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.

**आदेशाचा दिनांक.—** १६ जुलै २००८.

**न्यायपीठ /उपस्थिती.—** सन्मा. सदस्य श्री. टी. सिंगारवेल.

**प्रकरणाचे स्वरूप.—** स्थानिक पोलिसांनी हात उचलल्याबद्दल तक्रार.

**आयोगाने केलेली कारवाई .—**

पोलीस अधीक्षकाकडून अहवाल मागविला होता. अहवालाचे संपूर्ण वाचन लक्षपूर्वक केले असता असे दिसून येते की, सदर आरोप हा नारायणगाव पोलीस स्टेशनने केलेल्या तपासाबाबत होता. चौकशी अंतर्गत नारायणगाव पोलीस स्टेशन विभागाचे मुख्य कॉन्स्टेबल यांच्या विरोधात (विरुद्ध) विभागीय चौकशीची सुरूवात केली.

**निर्णय :-**

रूपये १०,००० ची नुकसानभरपाई गृहमंत्रालय सरकारने ही कार्यवाही झाल्यानंतर ३० दिवसांचे आत तक्रारदाराला अदा करावी अशी शिफारस करण्यात आली आहे. तसेच कामकाजाची प्रत अतिरिक्त मुख्य सचिव गृह विभाग यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी देण्यात यावी. आवश्यक त्या कारवाईसाठी तक्रारीची प्रत आणि अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना २ अहवालाच्या प्रति सोबत जोडाव्यात.

२. **प्रकरण क्रमांक – ३८९७/२००७-०८/७८५**

**तक्रारदाराचे नाव.—** श्रीमती ताराताई दिलीप मुन.

**प्रतिवादीचे नाव.—** संयुक्त संचालक, उच्च आणि तांत्रिक शिक्षण, नागपूर.

**आदेशाचा दिनांक.—** २० जानेवारी २००९.

**न्यायपीठ /उपस्थिती.—** सन्मा. सदस्य श्री. टी. सिंगारवेल.

**प्रकरणाचे स्वरूप.—**

तक्रारदाराने आपल्या तक्रारीत असे नमूद केले होते की, तीला तिच्या मृत नवऱ्याच्या मृत्यूनंतर कोणतीही अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळाली नव्हती आणि हे तिच्या मानवी हक्काचे उल्लंघन होते म्हणून तिने विद्या प्रकाश संस्था, चंद्रपूर जिल्हा यातील पदाधिकाऱ्याविरुद्ध आयोगाकडे तक्रार नोंदविली, प्रतिवाद्याने अशी माहिती दिली की तक्रारदाराला वर्ग चतुर्थ श्रेणीचे पद देण्यात आले तथापि तिने आयोगाकडे विनंती करून उच्च व तंत्र शिक्षण सहसंचालक, नागपूर यांना तिला वर्ग ३ चे पद मिळण्याची मान्यता मिळावी यासाठी विनंती केली होती, कारण जो तिचा नवरा मृत्यूपूर्वी वर्ग ३ (विज्ञान विभाग) येथे सेबेत होता, परंतु त्यासाठी प्रयोगशाळेचा कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्यामुळे तक्रारदाराची ही मागणी पूर्ण करणेस प्रतिवादीस शक्य नाही.

**आयोगाने केलेली कारवाई:—**

उच्च तांत्रिक शिक्षण, नागपूर येथून थेट संयुक्त अहवाल मागविण्यात आला होता श्री. अरविंद जस्वाल, सचिव, विद्या प्रकाश संस्था यांना सुद्धा बोलावले होते. नागपूर येथील सुनावणीच्या कार्यवाहीची एक प्रत उच्च आणि तांत्रिक विभाग, संयुक्त संचालक, पुणे यांना पाठविण्यात आली होती. त्यांनी श्रीमती मुन यांना आधीच अनुकंपा सदराखाली पदाला मान्यता दिली होती. त्यामुळे त्यांना अनुकंपा आणि त्यांच्या पातळीवर स्वतंत्र मान्यतेची आवश्यकता नव्हती.

**आयोगाचा निर्णय:—**

तक्रारदाराची तक्रार या आयोगाच्या हस्तक्षेपामुळे निवारण केल्याने ही केस बंद करण्यात आली.

**३. प्रकरण क्रमांक – ५८०९, ५८०९-अ, ते ग, ५९२६ ते ५९४५/२००८-०८/८९९३**

**तक्रारदाराचे नाव.—** ताराबाई देवराव देशमुख.

**प्रतिवादीचे नाव.—** अतिरिक्त मुख्य सचिव (आरोग्य विभाग) आदेशाचा.

**दिनांक.—** ११ ऑगस्ट २००८.

**न्यायपीठ/उपस्थिती.—** श्री. सुभाष लाला (आयएएस निवृत्त) मान. सदस्य.

**प्रकरणाचे स्वरूप.—**

तक्रारदाराने पालिकेच्या हॉस्पिटलमध्ये विनंती केली आहे की त्याचे मोतिबिंदूचे ऑपरेशन व्यवस्थित झाले नाही म्हणून पालिकेच्या कार्यपद्धतीवर त्याची तक्रार आहे.

**तक्रारीचे स्वरूपः—**

परभणी येथील ऑपरेशन थिएटरमध्ये अंधत्व नियंत्रणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत शल्यचिकित्सक यांनी आपल्या अहवालात असे सांगितले की, ३३ प्रकरणापैकी २८ रुग्णांना डोळ्याचा संसर्ग झाल्यामुळे, त्या २८ जणांना आपली दृष्टी गमवावी लागली. मान. मुख्यमंत्र्यांनी ह्या प्रकरणातील प्रत्येक रुग्णाला रु. २५,००० चा आर्थिक मदत दिली, आता अर्जदार आर्थिक नुकसानभरपाईसाठी विनंती करीत आहे. सरकारी आरोग्य विभागाद्वारे सदर घटनेबाबत सरकारने एक सदस्यीय समिती नेमून चौकशी करण्याची प्रस्ताव पारित केला. सदर एक सदस्य समितीची जबाबदारी ग्रॅन्ट मेडिकल कॉलेज मुंबईचे प्रमुख डॉ. टी. पी. लहाने यांचेकडे सोपविली आणि त्यांना सदरचा अहवाल आठ दिवसात सादर करण्याची सूचना केली. हॉस्पिटलच्या प्रशासन अयोग्य मार्गाने होण्यामुळे एका सर्जनची सेवा संपुष्टात आणली आणि एका प्रकरणात नर्सच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्याने सत्यप्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक होते. अतिरिक्त मुख्य सचिव, आरोग्य विभाग, यांनी अशी विनंती केली की, सरकारी अधिकाऱ्याच्या सदर घटनेमधील चुकीच्या वागण्यामुळे द्याव्या लागणाऱ्या नुकसानभरपाई संदर्भात सरकारी धोरणाबाबत अहवाल सादर करावा आणि अशा प्रकरणी, सरकार भरपाई देऊ शकते का ?

**आयोगाकडून निर्देशः—**

(१) या वैद्यकीय क्षेत्रातील हलगर्जीपणासाठी सर्वच व्यक्ती जबाबदार आहेत. असे डॉ. टी. पी. लहाने यांनी आपल्या अहवालात म्हटले आहे. त्यासाठी कायद्याच्या प्रक्रियेनुसार योग्य ते शासन त्यांना मिळाले पाहिजे. त्यांच्या या हलगर्जीपणामुळे खूप लोकांनी त्यांची दृष्टी गमावली आणि या राष्ट्रीय कार्यक्रमाला आणि सरकारला बदनाम केले.

(२) ज्या पीडित व्यक्तींनी या लोकांच्या हलगर्जीपणामुळे दृष्टी गमवावी लागली, या पीडित व्यक्ती त्यांच्या नातेवाईकांच्या आधाराशिवाय स्वतंत्र स्वावलंबी आयुष्य जगू शकणार नाही, अशी त्याची अवस्था आहे. या लोकांमधील बरेच जण मजुरीचे काम करत होते, ती मंडळी आता पूर्वीसारखे शारिरिक श्रम करून आपला उदरनिर्वाह करू शकत नाहीत आणि हे सर्व घडले ते केवळ सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे, डॉ. टी. पी. लहाने यांनी सादर केलेल्या अहवालामधून स्पष्टपणे दिसून आले आहे आणि म्हणूनच त्या पीडित व्यक्तींना अंतिमतः शासनाकडून भरपाई मिळणे हे आवश्यक आहे. सदर भरपाई ही किती असावी हे शासनाने त्याच्या स्तरावर एखाद्या तर्कसंगत उपलब्ध नियमाचा अथवा कायद्याचा आधार घेऊन ठरवायची आहे आणि अशा प्रकारच्या समान प्रकरणात बहूधा जे ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ आणि मोटार आणि वाहन अपघात कायदा, इ. अन्वये पालक केले जाते या तक्रारी प्राधान्य क्रमाने म्हणजे ६ आठवड्यामध्ये कार्यवाही करून त्याचा अहवाल आयोगास सादर करावा.

या शिफारशीद्वारा सदर केस मानवाधिकार संरक्षण कायदा, १९९३ कलम १७ (१)(ब) अन्वये बंद करण्यात आली.

**४. प्रकरण क्रमांक .— ३५७४/२००७-०८/८७४२**

**तक्रारदाराचे नाव.—** श्री. मंगेश काशीराम पालेकर व इतर.

**प्रतिवादीचे नाव.—** (१) अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण आणि निष्कासन विभाग),

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, बांद्रा (पूर्व).

**आदेशाचा दिनांक.—** ३१ जुलै २००८.

**न्यायपीठ /उपस्थिती.—** न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. क्षितिज व्यास (माजी मुख्य न्यायाधीश), अध्यक्ष.

**प्रकरणाचे स्वरूप .—**

तक्रारदार हे महाकाली दर्शन सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे रहिवाशी आहेत. तक्रारदार यांच्या पुनर्वसन योजनेची कार्यवाही रद्द करावयाची आहे. गुंदवली गाव येथील निष्कासन आणि पुनर्वसनचे कार्य त्यांनी थांबवण्याची अंतरिम मागणी केली आहे.

**आयोगामार्फत कार्यवाही .—**

मानवी हक्क आयोग नियमन व कार्यप्रणाली ८(३) नुसार हा वाद स्पष्टपणे नागरी आणि मालमत्ता वादाशी निगडित आहे. त्यामध्ये कार्यवाही करणे आयोगाला शक्य नाही हे सत्य आहे की अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या आदेशाविरुद्ध हे प्रकरण आहे. त्यानुसार तेथून तक्रारदारानी गुंदवली मधील स.क्र. ७८ आणि ७९ ची त्याच्या जागा रिकामी करून विकासकांच्या हवाली करावी अन्यथा ते बांधकाम पाडण्यात येईल, अर्जदारांनी प्रशासक आणि कोकण विभाग, अतिरिक्त आयुक्तांसमोर अपील दाखल केले. ज्यांनी सोसायटीस ७ दिवसांच्या आत करारनामा तयार करण्याचे निर्देश दिले व त्याचप्रमाणे तक्रारदारांनी आपल्या ताब्यातील जागा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत रिकाम्या करून द्याव्यात असे म्हटले.

**आयोगाचा निर्णय .—**

आयोग सदर प्रकरणात लक्ष घालू शकणार नाही परंतु अपीलार्थी आणि प्रतिवादी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, बांद्रा यांनी दिलेला निर्णय मान्य केला असून त्याची अंमलबजावणी करण्याचे कबूल केले आहे. तक्रारदारांनी असे निवेदन केले आहे की, ते झोपडपट्टीचे पुनर्वसन प्राधिकरणाकडे करारनाम्याची अंमलबजावणी संदर्भात ते त्यांचा हरकतनामा आजपासून २ आठवड्यांत दाखल करतील. सदरची प्रत सोसायटीस पाठविण्यात येईल. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने हरकतीची दखल घेऊन त्याबाबतचा त्यांचा निर्णय लवकरात लवकर म्हणजे शक्यतो हरकतनाम्याच्या प्राप्ती पासून २ आठवड्याचे आत ठरवावा. पक्षकारांस सदर निर्णय बंधनकारक असेल. सदर निर्देशानंतर सदर तक्रारीचे प्रकरण बंद करण्यात आले.

५ **प्रकरण क्रमांक - १९२/२००८-०९/८८७६**

**तक्रारदाराचे नाव.—** श्री. ज्ञानोबा सखाराम विखे.

**प्रतिवादीचे नाव.—** तुरूंग महानिरीक्षक, पुणे.

**आदेशाचा दिनांक.—** २४ जून २००८.

**न्यायपीठ /उपस्थिती.—** न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. क्षितिज व्यास, (माजी मुख्य न्यायाधीश), मान. अध्यक्ष.

**प्रकरणाचे स्वरूप.—**

तक्रारदार हा भारतीय दंड विधान कलम ३०२ अंतर्गत त्याने केलेल्या गुन्ह्याबद्दल त्याला जन्मठेपेची शिक्षा होत आहे. त्यानं औरंगाबादच्या तुरुंगात पाठविण्याची विनंती केली, तो रत्नागिरीच्या विशेष तुरुंगात कैदी म्हणून शिक्षा भोगत होता.

**आयोगाची कारवाई.—**

त्याच्या व्यक्तिगत कारवायांमुळे त्याला रत्नागिरीला पाठविण्यात आले, असे दिसून येते. म्हणून त्याला औरंगाबादमधून रत्नागिरी विशेष तुरुंगामध्ये पाठविणे आवश्यक आहे. वरिष्ठ तुरुंगाधिकारी यांनी असे निवेदन केले की, गुन्हेगाराने त्याला रत्नागिरीवरून औरंगाबादेस पाठविण्याची केलेली विनंती सध्या तुरुंगाचे प्रमुख निरिक्षकांच्या विचारधीन आहे. जेल प्राधिकरण या बाबतीत जाणीव आहे की, आरोपीस रत्नागिरीस रवाना केल्याने आरोपीच्या परिवारातील सदस्यांना त्रास होऊ शकतो, ते आरोपीस रत्नागिरी येथे भेटू शकणार नाहीत, जी जागा सदर कुटूंब जिथे राहते, त्या ठिकाणापासून जवळपास ७०० कि.मी. दूर आहे म्हणून उप महानिरीक्षक, मध्यवर्ती कारागृह विभाग, औरंगाबाद (परभणी जिल्हा कारागृह) यांच्या अधिपत्याखाली हलविण्याचा विचार आहे. सदर प्रस्ताव या प्राधिकरणाने मान्य केला, यामुळे सदर आरोपीची समस्या सुटणार नव्हती. हा तात्पुरता उपाय होता. आरोपीला इतक्या दूरवर अंतरावर हलवून जे ठिकाण आरोपीच्या नातेवाईकांच्या राहण्याच्या ठिकाणापासून ७०० कि. मी. अंतरावर असल्याने निश्चितपणे आरोपिच्या नातेवाईकांना आरोपिस वरचेवर भेटण्याच्या हक्कापासून वंचित करण्यात आले आहे.

**आयोगाचा निर्णय.—**

आयोगाच्या मतानुसार सदर समस्येबाबत गंभीर विचार करण्याची गरज आहे. आयोग म्हणूनच अशी शिफारस करते की, कारागृह प्राधिकरणाने केवळ याच प्रकरणाबाबत नव्हे तर इतर आरोपीबाबत जे जवळपासच्या भागात राहतात अशा संबंधित आरोपींना इतरत्र हलविण्याबाबतही विचार करावा. सदर आरोपींच्या केस यानुसारच हाताळण्यात यावी.

सदर शिफारशीसह सदर केस बंद करण्यात आली.

६ **प्रकरण क्रमांक – ४९९९/२००८-०९/३०४**

**तक्रारदाराचे नाव.—** श्री. प्रकाश डी. दळवी

**प्रतिवादीचे नाव.—** (१) पोलीस आयुक्त, ठाणे

(२) जिल्हा उप निबंधक, सहकारी सोसायटी, वर्धावत मेन्शन, शिवाजी पथ, ठाणे (प).

(३) सचिव, रघुकूल को-ऑप. हौसिंग सोसायटी, पारसिकनगर, कळवा, ठाणे.

**आदेशाचा दिनांक.—** २३ जानेवारी २००९.

**न्यायपीठ /उपस्थिती.—** श्री. सुभाष लाला (आयएएस निवृत्त) मान. सदस्य.

**प्रकरणाचे स्वरूप.—**

अर्जदाराची अशी तक्रार आहे की, सोसायटीने त्याच्या पाण्याचा प्रवाह तोडला.

**आयोगाची कार्यवाही.—**

अर्जदाराचा पाणीपुरवठा त्यांनी जोडला आणि सहकारी संस्थेच्या विभागाने योग्य ती कारवाई केली. पुढे असे प्रतिपादन केले की, तक्रारदार हा सोसायटीचा दोषी सदस्य आहे आणि त्याने अद्यापर्यंत देखभाल शुल्क भरले नाही.

**आयोगाचा निर्णय.—**

अर्जदाराला असे सूचविण्यात आले की त्याने सोसायटीची आतापर्यंतची थकबाकी चुकती करावी आणि वर्षभर दरमहा हप्ता भरावा. त्यामुळे पुन्हा अशी परिस्थिती उद्भवणार नाही त्यानुसार मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ नुसार नियमन कलम १७ (१)(ब) नुसार हे प्रकरण बंद करण्यात आले.

**सरकारकडून नाकारण्यात आलेल्या शिफारशी –**

**(१) प्रकरण क्रमांक - डी.के. बसू. २ / २००७-०८**

**तक्रारदाराचे नाव.—** श्री. मनीवेलन.

**प्रतिवादीचे नाव.—** (१) एसीएस (गृह).

(२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र.

(३) श्रीम. प्रज्ञा सरवदे (एसीपी), सहा. पोलीस आयुक्त, भ्रष्टाचार विरोधी पथक, महाराष्ट्र.

(४) श्री. डी. एन. भोंगे, तपासी अधिकारी, सह. पोलीस आयुक्त, भ्रष्टाचार विरोधी पथक, मुंबई.

(५) श्री. पांडूरंग शिंदे, सहा. पोलीस आयुक्त, भ्रष्टाचार विरोधी पथक, मुंबई.

(६) श्री. महेश पोटे, माजी अधिकारी, भ्रष्टाचार विरोधी पथक, मुंबई.

**आदेशाचा दिनांक.—** २२ ऑगस्ट २००८.

**न्यायपीठ/उपस्थिती.—** न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. क्षितिज व्यास, (माजी मुख्य न्यायाधीश ) मान. अध्यक्ष.

**प्रकरणाचे स्वरूप.—**

तक्रारदाराने ज्यांच्याविरुद्ध चालू असलेल्या तपासास आव्हान दिले आहे आणि प्रतिवादी जो पोलीस अधिकारी आहे त्याने केलेल्या अटकेबाबत आव्हान दिले आहे.

**आयोगाने केलेली कारवाई.—**

आयोगाचे निरीक्षण असे आहे की, पोलीस एसीपी यांनी त्यांच्या अधिकाराचा व हक्काचा दुरुपयोग केला असून तक्रारदाराच्या कोठडीतील निवासामध्ये त्याला वाईट वागणूक दिलेली आहे आणि अशा प्रकारे सुप्रिम कोर्टाने श्री. डी. के. बसू विरुद्ध स्टेट ऑफ बंगाल या प्रकरणात दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केले आहे. त्यानुसार प्रतिवादी नोटीस जारी केल्या असून त्यांना सदर नोटिसांना उत्तर सत्यप्रतिज्ञेद्वारे देण्यास सांगितले आहे.

**आयोगाचा निर्णय.—**

या प्रकरणी आयोगाचे तक्रारदारास रुपये २५,००० ची भरपाई देण्याची शिफारस केली आहे आणि पोलीस आयुक्त, श्रीमती सरवदे यांची पोलीस महासंचालकाद्वारे विभागीय त्वरित चौकशी करण्याची शिफारस केली आहे.

**सदर शिफारशीबाबत शासनाने केलेली कारवाई:—**

सदर आयोगास गृह विभाग मंत्रालय यांचेकडून दिनांक १५ एप्रिल २००९ रोजीचे पत्र मिळाले असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, आयोगाने सदर तक्रारीची दखल जी घटना घडल्यानंतर १ वर्षाने नोंदविली होती. जी मानवी अधिकार संरक्षण कायदा, १९९३ मधील कलम ३६ (२) च्या विराधी आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन सदर नुकसानभरपाई रुपये २५,००० तसेच पोलीस आयुक्त यांचे विरुद्ध करण्यात आले की विभागीय चौकशीची शिफारस नाकारत आहे.

**२ प्रकरण क्रमांक – ६६३/२००६-०७**

**तक्रारदाराचे नाव.—** मारूती गुणेवारी.

**प्रतिवादीचे नाव.—** (१) पोलीस अधीक्षक, चंद्रपूर.

**आदेशाचा दिनांक.—** २७ फेब्रुवारी २००९.

**न्यायपीठ /उपस्थिती.—** श्री. टी. सिगारवेल, मान. सदस्य.

**प्रकरणाचे स्वरूप.—** तक्रारदाराने त्याच्या मुलाच्या अनैसर्गिक मृत्यूबाबत तक्रार नोंदविली आहे.

**आयोगाने केलेली कारवाई.—**

सदर प्रकरण सक्षम न्यायालयापुढे प्रलंबित आहे. तथापि, तक्रारदाराच्या तक्रारीबाबत मानवी हक्काचे उल्लंघन झाले आहे ही बाब स्पष्ट झाली आहे की, सदर प्रकरण गेली २३ वर्षे विविध कामकाज प्रक्रिया व सदर केस स्थानिक प्राधिकरणाकडून सी.बी.आय कडे पाठविण्याच्या प्रक्रियेमध्ये विलंबित आहे.

**आयोगाचे निर्णय.—**

आयोगाने अंतरिम भरपाईची रुपये १,००,००० इतकी रक्कम राज्य सरकारकडून तक्रारदारास देण्यात यावी कारण तक्रारदाराच्याबाबत त्यांनी स्पष्टपणे मानवाधिकाराचा भंग केला आहे त्यामुळे घटनेच्या कलम २१ मधील तत्त्वाआधारे त्वरित न्यायनिर्णय अपेक्षित आहे.

**शिफारशीनंतर शासनाची कारवाई.—**

आयोगास वरील पो.नि. चंद्रपूर यांचेकडून दिनांक ३० नोव्हेंबर २०१२ रोजीचे पत्र तसेच दिनांक १२ जून २००९ रोजीचे गृह विभाग, मंत्रालय यांचेकडून पत्र मिळाले, ज्यामध्ये रुपये १,००,००० इतकी भरपाई तक्रारदारास मिळावी, अशी शिफारस करण्यात आली होती, परंतु ही शिफारस शासनाकडून नाकारण्यात आली.

## परिशिष्ट " अ "

**सर्वोच्च न्यायालयाने सर्व अटक वा स्थानबद्धतेच्या प्रकरणांसदर्भात अंमलात आणण्याच्या खालील ११ आवश्यकतांचे प्रतिपादन केले आहे.**

(१) जो पोलीस कर्मचारी अटक व अटक व्यक्तिची चौकशी हाताळत असेल त्याने अचूक दिसेल असे स्पष्ट ओळखपत्र ठेवले पाहिजे, त्यामध्ये नाव व पद दाखविले गेले पाहिजे. अशा सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना तपशील जे अटक व्यक्तिची चौकशी करीत असतात, नोंदवहीमध्ये नोंद झाली पाहिजे.

(२) जो पोलीस अधिकारी अटक व्यक्तिची अटक करीत त्याने अटकेच्यावेळी टिपण / मेमो बनविला पाहिजे, जो मेमो कमीत कमी एक तरी साक्षीदाराने साक्षीत केला पाहिजे, जो अटक व्यक्तिच्या कुटुंबाच्यापैकी पाहिजे किंवा जेथून अटक झाली आहे त्या स्थळातील माननीय व्यक्ती असली पाहिजे. ते अटक व्यक्तिने स्वाक्षरी केलेले असले पाहिजे व त्यामध्ये अटकेची दिनांक व वेळ असली पाहिजे.

(३) अटक व्यक्ति किंवा पकडलेली व्यक्ती पोलीस ताब्यामध्ये असेल किंवा चौकशी केंद्र किंवा कैदखान्यामध्ये असेल, त्याच्या मित्राला किंवा नातेवाईक किंवा दुसरा माणूस त्यांना ओळखणारा किंवा त्याच्या भलाईमध्ये रस असणारा, जेवढे शक्य असेल तेवढ्यांना कळविले पाहिजे की ती व्यक्ती अटक आहे किंवा पकडून ठेवलेली आहे, व कोणत्या ठिकाणी आहे, परंतु अटक मेमोचा साक्षीदार स्वतः अटक व्यक्तीचा मित्र किंवा नातेवाईक असेल तर तसे सांगण्याची गरज नाही.

(४) अटक व्यक्तिच्या अटकेची वेळ, अटकेची जागा व अटक व्यक्तिला जेथे ताब्यात ठेवले आहे हे सर्व पोलिसांनी जेथे अटक व्यक्तिचा मित्र व नातेवाईक रहात असेल तेथे कळविले पाहिजे, जो जिल्ह्याच्या किंवा शहराच्या बाहेर असेल तर विधी मदत संस्था व संबंधित पोलीस ठाण्यामार्फत अटकेच्या आठ ते बारा तासामध्ये तारेने कळविले पाहिजे.

(५) अटक व्यक्ती अटकेच्यानंतर जेवढे लवकर होईल तेवढे त्याला त्याच्या हक्काची जाणीव करून दिली पाहिजे की त्याच्या अटकेची किंवा पकडून ठेवले आहे त्याची माहिती कोणाला तरी दिली पाहिजे.

(६) जेथे अटक केले आहे तेथे नोंदवहीमध्ये अटकेची नोंद केलेली पाहिजे, ज्यामध्ये अटकेची माहिती अटक व्यक्तिच्या मित्राला दिलेली आहे. त्या मित्राचे नाव व ज्या पोलीस अधिकाऱ्यांच्या ताब्यामध्ये अटक व्यक्ती आहे, त्या पोलीस अधिकाऱ्यांचा तपशील दिलेला असला पाहिजे.

(७) अटक व्यक्ती, जेथे तो विनंती करीत असेल तेथे त्याची अटकेच्या वेळी तपासणी झाली पाहिजे व ज्या काही छोट्या व मोठ्या जखमा त्याच्या / तिच्या शरीरावर असतील तर त्याची त्यावेळी नोंद झाली पाहिजे. निरीक्षण मेमो अटक व्यक्ती व अटक करणारा पोलीस अधिकारी या दोघांनी स्वाक्षरी केलेला असला पाहिजे व त्याची प्रत अटक व्यक्तिला दिलेली असावी.

(८) अटक व्यक्तिची वैद्यकीय तपासणी त्याच्या अटकेतील प्रत्येक ४८ तासाने शिकलेल्या डॉक्टरकडून झाली पाहिजे, जो डॉक्टर मान्यताप्राप्त सूची, संबधित निर्देशक , राज्य व केंद्रीय प्रदेश, आरोग्य सेवा यांनी नेमणूक केलेला असावा. निर्देशक, आरोग्य सेवा, यांनी तशी सूची सर्व तालुके व जिल्ह्यांकरिता सुद्धा तयार करावी.

(९) सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यामध्ये अटक मेमो, वरती उल्लेख केलेला, न्यायाधिशांनी त्यांच्या नोंदणीसाठी पाठविल्या पाहिजेत.

(१०) अटक केलेल्या व्यक्तिला त्याच्या चौकशीच्या वेळी त्याच्या वकीलांना भेटण्याची परवानगी जरी संपूर्ण चौकशीच्यावेळी नसली तरी, परवानगी दिली पाहिजे.

(११) सर्व जिल्हे व राज्य मुख्यालयात एक कंट्रोल रूम पुरविला पाहिजे, जेथे अटक करणाऱ्या अधिकाऱ्यांने अटक व्यक्तिच्या अटकेबद्दल व जेथे ताब्यात ठेवलेल्या जागेबद्दल माहिती अटकेच्या बारा तासाच्या आत दिली पाहिजे व पोलीस कंट्रोल रुममध्ये दिसेल अशा सूचना फलकावर प्रदर्शित केल्या पाहिजे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.